(Marathi)

1031
9121

1362

18

P

No. 10.
1362. Mar.

# राष्ट्रीय पद्यावली

## ( प्रभात-फेरीचीं गाणीं )

IMPERIAL RECORD
RECEIVED.
21 NOV. 1930
DEPARTMENT

२

नवीन आवृत्ति

प्रकाशक—भावे आणि मंडळी, बुकसेलर्स,
ठाकुरद्वार नाका, मुंबई

**किंमत १ आणा**

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1362
Date 12.1.72
GOVT. OF INDIA

# इंग्रजांचा पराभव

लेखक—श्रीयुत अच्युत बळवंत कोल्हटकर

इंग्रजांनीं मराठ्यांचा पराभव केला असेल तर मर्द मराठ्यांनीं इंग्रजांचाहि कसा अद्भुत पराभव केला याचें शब्दचित्र या कादंबरींत अत्युत्कृष्ट असून मर्द मराठ्यांचा पराक्रम फ़क्त याच सचित्र कादंबरींत पहावयास मिळेल.

किंमत १॥ रुपया

कोणत्याही लेखकाचें कोणतेंही पुस्तक पहिल्यानें आमचेकडे मागवा.

भावे आणि मंडळी, बुकसैलर्स आणि पब्लिशर्स,
ठाकुरद्वार, मुंबई.

# राष्ट्रीय पद्यावली

## प्रभात फेरीचीं गाणीं.

१

( भुजंगप्रयात )

निशा संपली, जाहली सुप्रभात ।
उषा दिव्य संदेश घेऊन येत ॥
तिचे दिव्य संदेश या आयकाया ।
नका बंधुनो ! घालवूं संधि वायां ॥ १ ॥

। पद ।

राष्ट्रिय झेंडा पहा आमुचा
गगनीं फडफडणार
आतां स्वराज्य आम्हि घेणार ॥ १ ॥

मर्द मराठे आणिक सारे
　　उगा न कधिं बसणार।
　　　　जन हो गांधि-लढा लढणार ॥ २ ॥

नोकरशाही लाठीशाही
　　गाजवीत बसणार।
　　　　नाहीं आम्ही तिला डरणार ॥ ३ ॥

परकी सत्ता लाठीवाली
　　हुकुम कोण करणार ?
　　　　आम्ही मुळिं न तिला नमणार ॥ ४ ॥

गांधी-नेहरू कारागारीं
　　असेच काय बसणार ?
　　　　कां त्यां तुम्ही सोडविणार ? ॥ ५ ॥

मंत्र गांधिचा ऐकुनि आपण
　　शपथ हीच घेणार।
　　　　कीं "स्वदेशीच वरणार" ॥ ६ ॥

बंधु, भगिनिनों उठा उठा तर
　　काय झोंप घेणार।
　　　　का हा झेंडा फडकविणार ? ॥ ७ ॥

मातृभूमिचें रक्षण करण्या
आम्हि सिद्ध होणार ।
आमुचा झेंडा फडफडणार ! ॥ ८ ॥

---

## जगिं उरला उपकारापुरता !

( चालः—श्रीविश्ववंद्य गणराज. )

तो विश्ववंद्य गांधी । जाहला बंदी ॥ ध्रु० ॥
शांतिबलानें भ्रांति घालवी ।
जग त्याला वंदी । जाहला बंदी ॥ १ ॥
वेडा म्हणतां वेडचि लावी ।
गुंगे आनंदीं । जाहला बंदी ॥ २ ॥
सत्यचि बोले । सत्यचि चाले ।
सत्याचा छंदी । जाहला बंदी ॥ ३ ॥
जगिं उरला उपकारापुरता ।
कसला तो कैदी । जाहला बंदी ॥ ४ ॥

शत्रूलाही मित्र लेखुनी ।
उतरवितो धुंदी । जाहला बंदी ॥ ५ ॥
अनंत छंदी कवि हा वेडा ।
नाचे आनंदीं । जाहला बंदी ॥ ६ ॥

---

**पद** ( घनःश्याम सुंदरा० या चालीवर )

उठा बंधुंनो, उठाच आतां, सुप्रभात झाली ।
परदास्याची दीर्घकालची निशा सरत आली ॥ ध्रु० ॥
श्वेत रात्रिकीटकरव आतां सहज बंद पडला ।
घूकवृंद घूत्कार सोडुनी गिरिगव्हरिं दडला ।
दास्यजनित अज्ञानतिमिर नभिं होता जो भरला ।
स्वराज्यरविकर फांकतांचि तो समूळ ओसरला ॥
चाल । हा चक्रवाक गांधी सामोरा जाउनी ।
रंजवी रवीला गोड गान गाउनी ।
किलबिलाट करिती इतर खगहि धावुनी ।
असा समय हा कसा दवडितां, नभीं अंशुमाली ।
हाक मारितो, उठा झडकरी व्हा स्वराज्यशाली ॥ १ ॥

---

( सदा हृदयीं या )

चला सेवेला, सुप्रसंग आला । झिंदाबाद बोला राष्ट्रसंघ आला ॥

कहर उसळला, जुलुम वाढला, देश विकल जाहला झणीं समरिं पातला, गांधि आला ॥ १ ॥

घाव सोसतां होई देव तत्वतां पहा दगड तो स्वतां झणीं यत्न साधतां बोध झाला ॥ २ ॥

देशसेवकां कष्ट अतिनिका देशी जगन्नायका असा अंत बघसि कां जगत्पाला ॥ ३ ॥

प्रभुसि विनवूं या देईं बुद्धि नृप नया करीं प्रभुवर सुदया झणीं दास्य नुरविं या हिंदबालां ॥ ४ ॥

---

२

( आनंदकंद ऐसा )

स्मरणीं सदा असावें । ते देशबंधु भावें । नेहरू स्वमातृ-भाला । नमुनी विदेशि झाला । जय त्यासि नित्य बोला । नमुनी अनन्यभावें ॥ १ ॥

आबास वृद्ध झाला । कारागृहीं निघाला । देण्या तुम्हां सुखाला । उतराई त्यासि व्हावें ॥ २ ॥

देवी सरोजिनी ती । निरपेक्ष साह्यकर्ता । वनवासि होय बोला । जय तीस एकभावें ॥ ३ ॥

सत्याग्रहींत वीर । पुण्याग्रहींत शूर । समरीं शिरे सुधीर । भोपटकरा नमावें ॥ ४ ॥

ते बाबुराव गेले । देशार्थ कष्ट केले । स्वसुखासि धिःक-रीलें । त्यांतें सदा स्मरावें ॥ ५ ॥

या होमकुंडिं आजी । आहूति देति गाजी । देशार्थ स्वत्व त्याजी । त्यांतें सदा स्मरावें ॥ ६ ॥

मेरुमणी महात्मा । तिलकासमान आम्हां । जगतासि मान्य धर्मा । त्यांतें सदा नमावें ॥ ७ ॥

---

## २

### ( सबसे राम भजन कर )

झाला देश भिकारी पहा नुरलें सत्व जनांत अहा ॥ ध्रु० ॥

मँचेस्टरचें कापड नाहीं ताडी माडी पाडी । दारिद्र्याच्या घोर कर्दमीं उघडा डोळे आधीं ॥ १ ॥

नाना व्यसनें जडवुनि अंगी भेदनीति माजविती । परकी कोल्हे खवा खाउनी हातिं नरोटी देती ॥ २ ॥

धर्मभावना उज्ज्वल करुनी आत्मकार्य साधावें । भेदनीतिनें राज्य करावें ऐसी कुटिला नीति ॥ ३ ॥

अर्भक अबला यांना देती लत्ता लाज त्यजोनी । समजा उमजा अजुनी तरि हो बहिष्कार घ्या हातीं ॥ ४ ॥

सत्तामद हा न टिके ऐसें शास्त्रपुराणें वदती । सहस्र पापें पुरतीं भरतां–अनर्थ होइल पुढती ॥ ५ ॥

---

४

( चालः—क्या धोका दे रहि यारो । माबाप ये सरकार )

बघुं कोण रोकतो आम्हां । स्वातंत्र्य आम्ही घेणार ॥ ध्रु० ॥
पूर्वी ज्या चळवळी झाल्या । वाटला खेळ जगताला ।
परि आतां निश्चय केला । मागें न आम्ही हटणार ॥ १ ॥
शिणलीस मायभू भारी । आजवरी कारागारीं ।
दे सोडुन चिंता सारी । तुज खास मुक्त करणार ॥ २ ॥
राणाजि, शिवाजी, बाजी, । बहु दुःख तुम्हां देते जी ।
परसत्ता ती आतांचि । विलयास पार नेणार ॥ ३ ॥
हैदरा टिपू सुलताना । धरिलेंस भाइ ! कां मौना ।
‘ सोचना छोडकर गाना ’ । आझाद हिंद होणार ॥ ४ ॥

गांधिजी अतुल सेनानी । संग्राम शुद्ध शस्त्रांनीं ।
मरणाची भीति ध्यानीं । कोठली उभी रहाणार ॥ ५ ॥
सर्व देश स्वाधिन[1] व्हावे । राष्ट्रांत[2] प्रेम नांदावें ॥
कल्याण जगाचें व्हावें । हा यत्न आम्ही करणार ॥ ६ ॥
स्वातंत्र्ययुद्ध देशाचें । देवकार्य मानुनि साचें ।
आम्हि आपुल्या सर्वस्वाचें । बलिदान त्यांत करणार ॥ ७ ॥

---

## " घेऊं, स्वराज्य घेऊं ! "

( चालः—चरखा चला चलाकर... )

**चरखा फिरून फिरवूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ध्रु०॥**
**नुरली मनांत भीती । सत्यावरीच प्रीती ।**
**श्रद्धा कसास लावूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ १ ॥**
**गाऊं स्वदेशगीतें । काढूं सुतास हातें ।**
**खादीच नित्य लेवूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ २ ॥**
**व्यापार सर्व गेला । परदेश पुष्ट झाला ।**
**आतां स्वदेश सेवूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ ३ ॥**

---

१ स्वतंत्र. २ राष्ट्राराष्ट्रांत.

जनताजनार्दनाला । निज देशदेवतेला ।
सर्वस्व आज वाहूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ ४ ॥
टिळकांनिं हेंच केलें । गांधीहि तेंच बोले ।
देशास नित्य ध्याऊं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ ५ ॥
कवि हा अनंतछंदी । देशास नित्य वंदी ।
प्रेमें सुगीत गाऊं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ ६ ॥

---

( हरि माझ्या मंदिरिं कधिं तुम्ही याल ? या चालीवर )

बंधुजन, लवकरि–जागृत व्हा ॥ ध्रु० ॥
परवशताही शत-विध जाचे
दुःसह झाली पहा ॥ बंधुजन ॥ १ ॥
परतंत्रजीवनें नाडली जनता
दिसतसे त्रस्त अहा ॥ बंधुजन ॥ २ ॥
कर-भार जड बहु देऊनि कृषिवल
दिनि-दिनीं थकले पहा ॥ बंधुजन ॥ ३ ॥
परकीय नेती धन-धान्य लुटुनी
स्वजन उपाशी अहा ॥ बंधुजन ॥ ४ ॥

परवश–जीवन-बंधन टाकुनि
आधार स्वबलीं पहा ॥ बंधुजन ॥ ५ ॥
चरका-सुदर्शन फिरवुनि तनुवरि
देशी वसन वहा ॥ बंधुजन ॥ ६ ॥
स्वातंत्र्याचें ध्येय न सोडा
तत्फल त्वरित पहा ॥ बंधुजन ॥ ७ ॥

---

[ चाल–ऊठिं गोपालजी, जाइं धेनूकडे ]

संघशक्ती जरी । प्रबल व्हावी तरी ।
दृढ धरा अंतरीं । ऐक्यभाव ॥ १ ॥
द्वैत पावो लया । बघुनि ऐक्योदया ।
जेविं अरुणोदया । अंधकार ॥ २ ॥
ऐक्य तुमच्या मनीं । ऐक्यची भाषणीं ।
ऐक्यची वर्तनीं । नित्य राहो ॥ ३ ॥
ऐक्य जर साधलें । संघबळ वाढलें ।
सुकर मग जाहलें । देशकार्य ॥ ४ ॥
ऐक्य म्हणुनी वरा । संघ दृढ-तर करा ।
भारता उद्धरा । प्रार्थना ही ॥ ५ ॥

अधिक नच मागणें । अधिक नच सांगणें ।
सुज्ञ तुम्ही शाहणे । राष्ट्रदेव[1] ॥ ६ ॥

( चालः—सुनो सुनोजी मेरे यार )

द्या सोडुन सारी चैन । वापरा स्वदेशी कपडा ॥ ध्रु० ॥
मायभू भिकारी झाली । संपत्ति तियेचि गेली ।
चोरांनीं स्वगृहें भरिलीं । कशि नये तुम्हांला करुणा ॥ १ ॥
व्यापार कराया आले । आपसांत अम्हां लढवीलें ।
पारतंत्र्य शिरीं लादीलें । कशि नये० ॥ २ ॥
आमुचे धंदे बुडवीले । कारागिर विलया नेले ।
सर्वांस मजुर बनवीलें । कशि नये० ॥ ३ ॥
चोरांनीं मलिदा खावा । धत्तुरा धन्यासी द्यावा ।
हा न्याय कसा सोसावा । कशि नये० ॥ ४ ॥
परदास्य लयाला जावें । भारता सौख्य लाधावें ।
तरि देशी-व्रत आचरावें । 'आनंद' विनवि तुम्हांला ॥ ५ ॥

---

१ राष्ट्र आहे देव ज्यांचा असे.

चाल—( हरहर महादेव )

सोडुनि भारत जन-मन कैसा । हरहर स्वाभिमान गेला ॥ध्रु०॥

रुतली मातृभू दैन्य-पंकीं तरी निद्रासुख घेतां ॥
करुण स्वरें हो आक्रंदे ती त्राता नच अजि उरला
हरहर स्वाभिमान गेला ॥ १ ॥

पूर्वजविक्रम विसरुनि कांहो नादानचि बनलां ॥
स्वधर्मप्रीती स्वदेशप्रेमा लुला कसा अजि झाला ॥
हरहर स्वाभिमान गेला ॥ २ ॥

भेदभाव माजले भयंकर कलहानलिं पडला ॥
परकी फॅशन करी द्रव्यहिन देश दरिद्री झाला ॥
हरहर स्वाभिमान गेला ॥ ३ ॥

हिंददेश हा परमेशाचा आहे बहु प्यारा ॥
वाहुनि तत्पदिं तन-मन-धन हो समर्थ बनवा त्याला ॥
हरहर स्वाभिमान गेला ॥ ४ ॥

महाराष्ट्रांतील सरस्वतीभक्तांनीं तसेंच केसरी, महाराष्ट्र, नवा काळ, सुदर्शन, बलवंत, श्रद्धानंद, प्रताप, संदेश, रामदास रामदासी इत्यादि अनेक वृत्तपत्रांनीं मुक्तकंठानें एकदां तरी वाचण्याची शिफारस केलेलें

# महाराष्ट्राचा स्वातंत्र्यवीर

श्रीयुत वासुदेव बळवंत फडके यांचें चरित्र हल्लींच्या स्थितींत वाचल्यावांचून राहूं नकाच.

**किंमत फक्त १२ आणे**

हें व इतर कोणतेंही नवीन पुस्तक व ग्रंथ आमचेकडे पहिल्यानें मागवा.

**भावे आणि मंडळी,** बुकसेलर्स आणि पब्लिशर्स,

**ठाकुरद्वार, मुंबई.**

मराठ्यांचे अतुल पराक्रम, शौर्य, धैर्य यांचें सर्वोत्कृष्ट वर्णनचित्र

कै. सी. के. दामले

यांची सर्वोत्कृष्ट सचित्र ऐतिहासिक कादंबरी

# वसईचा रणसंग्राम

किंमत १। रुपया.

कोणतेंही नवीन पुस्तक व ग्रंथ आमचेकडे पहिल्यानें मागवा.

**भावे आणि मंडळी**, बुकसेलर्स आणि पब्लिशर्स,

**ठाकुरद्वार, मुंबई**

---

**प्रिंटर**—मंगेश नारायण कुळकर्णी, कर्नाटक छापखाना,
३१८ ए, ठाकुरद्वार मुंबई नं. २

**पब्लिशरः—स. के. भावे, चालक, भावे आणि मंडळी**, बुकसेलर्स, ठाकुरद्वार नाका, मुंबई.